# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - ४३१६०१

dyceogadzpnanded@gmail.com दुरध्वनी : ०२४६२ - २३४६६८.


जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/ 1138 / २०२६

दिनांक : 17 / ०४ /२०२६

**प्रति,**

१) विभाग प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद नांदेड

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड

**विषय :- सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन - २०२६**
सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्राथ.वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि. १५/०५/२०१४.
२. शासन शुध्दीप्रत्रक क्र.जिपब/४८१६/ प्र.क्र.-१६/आस्था-१४ दि. ०२/०१/२०१७.
३. शासन पुरकपत्र क्र.जिपब/४८१७/ प्र.क्र.-२२८/आस्था-१४ दि. ०४/०३/२०१९
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/९४४/२०२६ दि.३०/०३/२०२६

उपरोक्त विषयान्वये ग्रामविकास विभागाकडील संदर्भाधीन शासन निर्णय, शुध्दीपत्रक व पुरकपत्रान्वये जिल्हा परिषदेच्या गट - क (वर्ग-३) व गट- ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात येवून बदल्यांची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भीय कार्यालयीन पत्रान्वये विभागांतर्गत व तालुक्यांतर्गत कार्यरत असलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त गट - क (वर्ग-३) संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या दिर्घ वास्तव्यानुसार प्रशासकीय व विनंती बदल्यांची माहिती सादर करण्याबाबत विभाग प्रमुख (सर्व) व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड यांना सूचित करण्यात आले आहे.

संदर्भीय शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक व शासन पुरकपत्रातील तरतुदीनुसार प्राप्त माहितीच्या आधारे सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन- २०२६ करीता सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातील बदलीपात्र अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक ३१/०५/२०२६ रोजीची सेवा गृहित धरुन तयार करण्यात आलेल्या प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरील प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सदर वास्तव्य ज्येष्ठता यादी बाबत काही हरकती/सुचना/ आक्षेप/ व तक्रारी असल्यास पुराव्या कागदपत्रासह दिनांक २५/०४/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप / हरकतींचा विचार केला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार उभ्दवल्यास त्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच सर्व सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक यांची नावे जेष्ठता सुचीत आलेली आहेत किंवा कसे याची खात्री करावी. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशासकीय बदलीतून सुट किंवा प्राधान्य घ्यावयाचे आहे, त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज, सुट / प्राधान्य संदर्भातील आवश्यक ती पुराव्याची कागदपत्रे / प्रमाणपत्रासह दिनांक २५/०४/२०२६ पुर्वी कार्यालय प्रमुखांच्या शिफारशीने या कार्यालयास सादर करण्याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबत : प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी (०४ संवर्ग)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड करीता**

**स्थळ प्रतवर मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरी असे/-**